# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:20.02.2026** **वारः शुक्रवार**

---

1. छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती देशासह महाराष्ट्रात सर्वत्र उत्साहात साजरी
2. एआय इंडिया इम्पॅक्ट शिखर परिषदेच्या अनुषंगानं पंतप्रधानांची विविध जागतिक नेत्यांशी द्विपक्षीय चर्चा
3. आसाममधील व्हायब्रंट व्हिलेजेस प्रोग्राम-च्या दुसऱ्या टप्प्याचं आज उद्घाटन आणि
4. रणजी क्रिकेट करंडक स्पर्धेत कर्नाटक आणि जम्मू काश्मीर संघांमध्ये होणार अंतिम लढत

**शिवजयंती**

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती काल देशासह महाराष्ट्र राज्यात मोठ्या उत्साहात साजरी झाली. उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय मंत्री अमित शहा यांनी शिवजयंतीनिमित्त छत्रपती शिवरायांना अभिवादन केलं. छत्रपती शिवाजी महाराज एक दूरदर्शी नेते, कुशल प्रशासक, विलक्षण रणनीतीकार आणि स्वराज्याचे पुरस्कर्ते होते, अशा शब्दात पंतप्रधानांनी समाज माध्यमावरील संदेशात छत्रपतींना मानवंदना दिली. राजधानी दिल्लीतही शिवजयंती उत्साहात साजरी झाली. उत्तर प्रदेशातील आग्रा इथल्या ऐतिहासिक लाल किल्ल्यावरही शिवजयंतीच्या निमित्ताने 'शिवजन्मोत्सव भारतवर्ष का' या विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, यांच्यासह अन्य मान्यवर यावेळी उपस्थित होते.

मुंबईत दादरमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारुढ पुतळ्याला राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी अभिवादन केलं. शिवजयंतीचा महाराष्ट्र राज्यातला मुख्य शासकीय सोहळा महाराजांचं जन्मस्थान असलेल्या जुन्नरमधील शिवनेरी गडावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, तसंच उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, यांच्या उपस्थितीत अत्यंत उत्साहात साजरा झाला. छत्रपती शिवरायांनी दिलेला मार्ग हाच सर्वांगीण विकासाचा मार्ग आहे. त्यांच्या कार्याचा आदर्श जगासमोर ठेवण्यासाठी 2030मध्ये छत्रपती शिवाजी महाराजांची 400वी जयंती जागतिक स्तरावर साजरी केली जाईल, असं प्रतिपादन महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी केलं.

**मोदी-AI**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल नवीदिल्लीत भारत मंडपम इथं इंडिया एआय इम्पॅक्ट समिट 2026 चं औपचारिक उद्घाटन केलं. कृत्रिम बुद्धिमत्तेचं लोकशाहीकरण होणं आवश्यक असून, विशेषतः ग्लोबल साऊथ साठी कृत्रिम बुद्धिमत्ता हे समावेशन आणि सक्षमतेचं साधन बनायला हवं असं प्रतिपादन त्यांनी केलं. कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नैतिक वापराबद्दलही पंतप्रधानांनी महत्वाचे मुद्दे मांडले. या परिषदेला जगभरातले नेते आणि आघाडीच्या कंपन्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी उपस्थित आहेत.

**पंतप्रधान-सीईओ**

या परिषदेत काल संध्याकाळी, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी उद्योग-व्यवसायांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या गोलमेज परिषदेचे अध्यक्षस्थान भुषवले. या चर्चेतून, कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्राचा विकास, जबाबदारी, जागतिक सहकार्य बळकट करणं आणि विकासाच्या विविध संधी खुल्या करणे या संदर्भातील भविष्यवेधी अंतर्दृष्टी मिळाल्याचे पंतप्रधानांनी नमूद केले आहे. मानवी प्रगती आणि शाश्वत विकासासाठी कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करण्यासाठीची ही सामायिक वचनबद्धता नक्कीच आनंददायी असल्याचे पंतप्रधानांनी म्हटलं आहे.

**पंतप्रधान द्विपक्षीय चर्चा**

दिल्लीत सुरू असलेल्या एआय इम्पॅक्ट परिषदेच्या पार्श्वभुमीवर काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध जागतिक नेत्यांशी द्विपक्षीय चर्चा केली. फ्रान्सचे राष्ट्राध्यक्ष इमॅन्युएल मॅक्राँ, अबु धाबीचे युवराज- शेख खालेद बिन मोहम्मद बिन झायेद अल नाह्यान, नेदरलँडचे पंतप्रधान डिग स्कॉफ, स्वित्झर्लंडचे गाय पार्मेलिन आणि हेलेनिक प्रजासत्ताकचे पंतप्रधान किरियाकोस मित्सोटाकिस यांच्याशी त्यांनी संवाद साधला. भारत-युएई दरम्यानच्या विविध क्षेत्रात केलेल्या प्रगती बद्दल मोदी आणि अबू धाबीचे युवराज यांनी समाधान व्यक्त केले. कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात सहकार्य वाढवण्याच्या मार्गावर चर्चाही केली. स्वित्झर्लंडबरोबर व्यापार, गुंतवणूक, तंत्रज्ञान तसंच एआय नवोपक्रमात भविष्यातील भागीदारी तसंच आर्थिक सहकार्य बळकट करण्याविषयी चर्चा केली. तसंच दहशतवादविरोधी लढ्यातल्या भारताच्या भूमिकेला पाठिंबा दिल्याबद्दल मोदींनी जागतिक नेत्यांचे आभारही मानले.

**एआय परिषद**

एआय इम्पॅक्ट परिषदेचा आज पाचवा दिवस असून, कृत्रिम बुद्धिमत्तेतील जागतिक प्रशासन आणि सहकार्य यांसाठी सामूहिक जबाबदारी आणि सामाईक पथदर्शी आराखड्याची रूपरेषा दर्शवणारा नेत्यांचा जाहीरनामा स्विकारला जाणार आहे. या शिखर परिषदेत 500 हून अधिक कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रातील नेते सहभागी झाले आहे. या ठिकाणी आयोजित प्रदर्शन उद्यापर्यंत खुले राहणार आहे.

**ओपन-एआय**

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी काल दिल्लीत ओपन एआय कंपनीचे प्रमुख जॉर्ज ऑसबोर्न, तसेच कंपनीचे मुख्य जागतिक व्यवहार अधिकारी क्रिस लेहान आणि कंपनीच्या भारतातील धोरण आणि जागतिक व्यवहार प्रमुख प्रज्ञा मिश्रा यांची भेट घेतली. समाज माध्यमांवरून लिहिलेल्या संदेशात, या बैठकीत कृत्रिम बुद्धिमत्तेतील नवीनतम विकास, त्याचे उपयोजन आणि या क्षेत्राचा भारतातील जलद विस्तार यांबाबत चर्चा केली.

**गृहमंत्री-आसाम**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज आसाममधील कछार जिल्ह्यात व्हायब्रंट व्हिलेजेस प्रोग्राम-च्या दुसऱ्या टप्प्याचं उद्घाटन करणार आहेत. सीमावर्ती गावांमध्ये सुधारणा करणं, शाश्वत उपजीविकेच्या संधी निर्माण करण्याच्या उद्देशानं हा उपक्रम सुरू करण्यात येत आहे. 2028-29 पर्यंतच्या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमासाठी सहा हजार आठशे कोटी रुपयांपेक्षा जास्त निधीची तरतूद करण्यात आली आहे. देशातील 15 राज्यं आणि 2 केंद्रशासित प्रदेशांमध्ये हा उपक्रम राबवला जाणार आहे. दरम्यान केंद्रीय गृहमंत्री भारत-बांगलादेश सीमेवरील बीएसएफच्या नटुनपूर सीमा चौकीला भेट देऊन सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेणार आहेत. त्यानंतर अमित शाह त्रिपुरातील आगरतळाला भेट देतील. तर उद्या अमित शहा गुवाहाटी इथं सीआरपीएफच्या वार्षिक दिन संचलनाला उपस्थित राहणार असून सोनापूरमधील कासुतोली इथं आसाम पोलिस दलाच्या नवीन संकुलाची पायाभरणी देखील करतील.

**सिक्कीम**

छत्तीसगडमधील एका माध्यमांच्या शिष्टमंडळानं काल पूर्व सिक्कीममधील थेगू गावाला भेट दिली. या गावाचा व्हायब्रंट व्हिलेज प्रोग्राममध्ये समावेश करण्यात आला आहे. यावेळी इंडो तिबेटीयन सीमा पोलिस अधिकाऱ्यांनी व्हायब्रंट व्हिलेज प्रोग्राम अंतर्गत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमांची पत्रकारांना माहिती दिली. हे शिष्टमंडळ आज सिक्कीमचे मुख्यमंत्री प्रेमसिंग तमांग यांची भेट घेणार असून सेवोके रंगपो रेल्वे प्रकल्पालाही भेट देणार आहे.

**निवडणूक-SIR**

निवडणूक आयोगानं देशातील 22 राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना मतदार यादीच्या आगामी विशेष सखोल पुनरिक्षणाशी संबंधित तयारीचं काम पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. यामध्ये महाराष्ट्रासह विविध

राज्यांचा समावेश आहे.हे विशेष सखोल पुनरिक्षण येत्या एप्रिल महिन्यापासून पासून सुरू होण्याची शक्यता आहे. सध्या 12 राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये विशेष सखोल पुनरिक्षण सुरू असल्याचं निवडणूक आयोगानं सांगितलं आहे.

**<u>अमेरिका-ट्रम्प</u>**

अमेरिकेनं स्थापन केलेल्या बोर्ड ऑफ पीसच्या काल झालेल्या पहिल्या बैठकीत अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी गाझा मदत निधीसाठी 7 अब्ज अमेरिकन डॉलर्सपेक्षा जास्त आर्थिक सहाय्य करण्याची घोषणा केली. वॉशिंग्टन, डी. सी. इथं काल झालेल्या या बैठकीत आर्थिक अखंडता आणि पारदर्शकतेची तत्त्वे स्थापित करणाऱ्या ठरावावर ट्रम्प यांनी स्वाक्षरी केली.

**<u>सामाजिक न्याय</u>**

आज 20 फेब्रुवारी जागतिक सामाजिक न्याय दिन.यानिमित्तान सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालय, नवी दिल्ली इथल्या राष्ट्रीय कायदा विद्यापीठाच्या सहकार्यानं आज एक विशेष कार्यक्रम आयोजित केला आहे.

**<u>मानवी तस्करी</u>**

राष्ट्रीय तपास संस्था अर्थात एनआयएनं मानवी तस्करी आणि सायबर फसवणूक टोळीशी संबंधीत तीन जणांवर आरोप दाखल केलं आहे. भारतातील तसंच म्यानमारमधील दलालांमार्फत चालवल्या जाणाऱ्या या मानवी तस्करी प्रकरणामध्ये एका चिनी नागरिकाचाही समावेश आहे. परवाना नसलेल्या भारतीय नागरिकांना परदेशात नोकरीसाठी भरती करणं तसंच आग्नेय आशियातील गुन्हेगारी कारवायांसाठी त्यांचा वापर करण्यात त्यांचा सहभाग होता असं तपासादरम्यान एनआयएला आढळून आलं आहे.

**<u>विमानतळ-कॅफे</u>**

केंद्रीय नागरी विमान वाहतूक मंत्री राममोहन नायडू, राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ आणि माहिती आणि प्रसारण राज्यमंत्री डॉ. एल. मुरुगन आज कोइम्बतूर विमानतळावर उडान यात्री कॅफे आणि इतर सुविधांचं संयुक्तपणे उद्घाटन करतील. यामध्ये लहान मुलांसाठी खेळाची जागा, जीआय मानांकन प्राप्त उत्पादनांचं खरेदी दालन आणि ग्रंथालय यासारख्या नवीन सुविधा देखील बांधल्या जात आहेत.

**<u>रणजी क्रिकेट</u>**

देशांतर्गत क्रिकेटमध्ये, रणजी करंडक स्पर्धेत अकरा वर्षांच्या दीर्घ कालावधीनंतर कर्नाटकने अंतिम फेरीत धडक मारली आहे. दुसऱ्या उपांत्य सामन्यामध्ये कर्नाटक आणि उत्तराखंड यांच्यातील सामना अनिर्णित अवस्थेत संपला. मात्र कर्नाटकने पहिल्या डावात उभ्या केलेल्या 736 धावांमुळे कर्नाटकने अंतिम फेरीत प्रवेश मिळवला. अंतिम सामन्यात कर्नाटक संघाचा जम्मू आणि काश्मीरच्या संघाशी लढत होणार आहे.

**<u>क्रिकेट-टी-20</u>**

आयसीसी टी-20 विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत काल रात्री चेन्नईतल्या एमए चिदंबरम मैदानावर झालेल्या ड गटाच्या सामन्यात अफगाणिस्ताननं कॅनडाचा 82 धावांनी पराभव केला. तर कोलंबोमधील आर प्रेमदासा मैदानावर झालेल्या ब गटातल्या सामन्यात झिम्बाब्वेने श्रीलंकेवर सहा गडी राखून विजय मिळवला. त्याआधी दुपारी ईडन गार्डन्सवर झालेल्या क गटाच्या सामन्यात वेस्ट इंडिजने इटलीचा 42 धावांनी पराभव केला. या स्पर्धेत आज श्रीलंकेतल्या पल्लेकेले मैदानावर ब गटाच्या शेवटच्या सामन्यात ऑस्ट्रेलियाचा सामना ओमानशी होईल.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.